Vol II Issue XII June 2013

Impact Factor : 1. 2018

ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 1. 2018**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 12, June. 2013
**ISSN:-2231-5063**
Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *सातारा जिल्हयातील संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान कार्यक्रमातील अडचणी आणि उपाययोजना*

*संतोष मारूती भोसले*

(एम.ए.एम्.फिल.)
अर्थशास्त्र विभाग, कला,वाणिज्य महाविद्यालय, नागठाणे, ता. जि. सातारा

सारांश

कोणत्याही राश्ट्राची प्रगती ही त्या देशातील लोकांच्या निकोप आरोग्यावर अवलंबून असते. कोणत्याही समाजव्यवस्थेचा सर्वांगिण आणि संतुलित विकास होण्यासाठी जे अनेक घटक आवश्यक असतात त्यापैकी वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छता हे अलिकडच्या काळातील महत्वाचे घटक आहेत. स्वच्छतेचा संबंध, व्यक्ती आणि सार्वजनिक जीवनमानाशी निगडीत असतो. स्वतः स्वच्छ न राहता सार्वजनिक ठिकाणेसुध्दा स्वच्छ राहू न देण्यावर लोकांचा भर असतो.

## प्रस्तावना

घरातच बसून सांदीकोप—यात तंबाखू, गुटखा खावून थुंकणा—यांची संख्या कमी नाही. तसेच पानाची पिचकारी भर रस्त्यावर टाकणे, केळाची साल किंवा आंब्याची कोय रस्त्यावर, बस स्टॅण्डवर फेकून देणा—यांचीही संख्या कमी नाही. एवढेच नव्हे तर, शौचविधीसाठी उघडयावर बसणा—यांचीही संख्या कमी नाही. अशा स्वरूपाच्या अस्वच्छतेमुळे कावीळ, पोलिओ, अतिसार, हागवण, पटकी, विशमज्वर, गॅस्ट्रो यासारखे रोग होवू नयेत म्हणून भारत सरकारने 1999 पासून मागणी आधारित लोकसहभागीय तत्वावर 'संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान ' ही योजना भारतातील 374 जिल्हयात सुरू केली. या अभियानाला संपूर्ण भारतात बहुसंख्य लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असला तरी या अभियानात अनेक अडचणी दिसून येतात ही बाब लक्षात घेणे उचित ठरते. 1

## *1.संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाचे महत्व :*

भारत खेडयांचा देश आहे. आजमित्तीस भारतात 6.2 लक्ष खेडी असून भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 72.22 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. 2 या ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचाविण्यासाठी वैयक्तिक स्वच्छता, घराची स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता, पिण्यासाठी सुरक्षित पाणी, सांडपाण्याचे व घनकच—याचे नियोजन व व्यवस्थापन आणि मलमूत्राचे विसर्जन, शौचालयाचा वापर इत्यादी गोष्टींचे महत्व पटवून सांगणा—या संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानाला ग्रामीण भागात महत्वाचे स्थान देण्यात आले आहे.

महाराष्ट्रात ' संपूर्ण स्वच्छता अभियान ' ज्यावेळी सुरूवातीला (सन 2000—2001) राबविण्यांत आले. त्यावेळी ' हागणदारीमुक्त गाव ' या शब्दाला ' घाणेरडा ' म्हणत अनेकांनी विरोध केला. सुरूवातीला या विषयावर बोलायला लाजणारे हे कर्मचारी, अधिकारी व पदाधिकारी आता हागणदारीमुक्तीवर भाषणे करू लागली आहेत. लोकांचा अभियानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. मुलांपासून वृध्दांपर्यंत शौचालय वापरण्याची मानसिकता निर्माण झाली आहे. महाराष्ट्रातील काही गावात या अभियानामुळे घर तेथे शौचालकय, घर तेथे गांडूळखत निर्मिती, घर तेथे बायोगॅस निर्मिती इत्यादी उपक्रमांच्या माध्यमातून समृध्दीचा मार्ग चोखाळला जात आहे. तर काही गावात पाण्याचे टॅकरमुक्त गाव, रसायनमुक्त शेती, चराई बंदी, नशाबंदी, कु—हाडबंदी इत्यादी उपक्रम राबवून स्वच्छता व समृध्दी दोन्हींचा मार्ग चोखाळला जात आहे. बहुसंख्य निर्मल गावांमध्ये गॅस्ट्रो, कावीळ, हिवताप इत्यादी अस्वच्छतेमुळे होणा—या रोगांच्या रुग्णसंख्येत प्रचंड घट याच अभियानामुळे झाली आहे. ही रुग्णसंख्या 50 वरून 5 ते 6 इतकी घटली आहे.[3]

संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानामुळे महाराष्ट्रातील फक्त गावेच नव्हे तर लोकांची मनेही निर्मल झाली आहेत. महाराष्ट्रातील बहुसंख्य जिल्हयातील असंख्य ग्रामपंचयातींच्या निवडणुका बिनविरोध होत आहेत. गावातील नागरिकांनी परस्परांतील हेव्यादाव्यांना तिलांजली देवून ते एकत्रित गुण्यागोविंदाने नांदत आहेत. महाराष्ट्रातील काही जिल्हयातील अनेक गावे आता ग्रामविकासावरील अभ्यासकांसाठी ' अभ्यास केंद्रे ' ठरत आहेत. या गावांच्या अभ्यासाठी आंध्रप्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांबरोबरच बांगला देश, इंडोनेशिया देशातील अभ्यासकही भेटी देत आहेत.[4]

## *2.संषोधन पध्दती :*

महाराश्ट्रातील सहयाद्रीच्या द—याखो—यात वसलेल्या सातारा जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ 10475 कि.मी. असून जिल्हयात आशिया खंडामध्ये सर्वात मोठे असलेले वीज निर्मिती केंद्र पाटण तालुक्यात कोयनानगर येथे आहे. सातारा जिल्हयात सातारा, वाई, खंडाळा, कोरेगांव, फलटण, माण, खटाव, कराड, पाटण, जावली, महाबळेश्वर, असे एकूण 11 तालुके असून जिल्हयात 1496 खेडी आहेत. [5]

**Title :** *सातारा जिल्हयातील संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान कार्यक्रमातील अडचणी आणि उपाययोजना*
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** *संतोष मारूती भोसले* **yr:2013 vol:2 iss:12**

सातारा जिल्हयातील संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान कार्यक्रम व या अभियान कार्यक्रमातील अडचणी आजमाविण्यासाठी जिल्हयातील 11 तालुक्यातील सर्व्हेक्षित 11 गावांमधील एकूण कुटुंब संख्येच्या साधारणपणे 5 टक्के प्रमाणे निवडलेले 196 कुटुंबप्रमुख, 18 शाळांतील मुख्याध्यापक, 22 अंगणवाडी सेविका आणि 11 ग्रामसेवकांशी मुलाखत, त्यांच्याशी केलेली चर्चा व सखोल निरीक्षणाचा अवलंब करून सुसंवाद साधला. हा सुसंवाद साधताना स्वच्छता व आरोग्यविशयक सवयी व सुविधा, पायाभूत इतर सेवा व सुविधा आणि इतर महत्वपूर्ण घटकांबाबत सर्व्हेक्षण केले. सर्वेक्षण करीत असतांना प्रतिसादकांनी दिलेल्या माहितीवरून सातारा जिल्हयातील ' संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान कार्यक्रम ' व या अभियान कार्यक्रमातील अडचणी स्पश्ट झाल्या आहेत.

***3.सातारा जिल्हयातील शौचालयांची प्रगती :***

सातारा जिल्हयातील संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियाना अंतर्गत सन 2001–02 ते सन 2011–12 या कालावधीत बांधलेल्या शौचालयांची घटकनिहाय आणि वर्षनिहाय प्रगती कोष्टकांमध्ये दर्शविता येईल.[6]

कोष्टक क्रमांक 1.1

सातारा जिल्हयातील शौचालयांची वर्षनिहाय प्रगती

| अ.नं. | वर्ष | वैयक्तिक शौचालये (दारिद्रय रेषेखालील) | वैयक्तिक शौचालये (दारिद्रय रेषेवरील) | एकूण शौचालये (दारिद्रय रेषेखालीलव दारिद्रय रेषेवरील) | शालेय शौचालये | सार्वजनिक शौचालये | अंगणवाडी शौचालये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2001–02 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | 2002–03 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | 2003–04 | 888 | 7124 | 8012 | 157 | 0 | 0 |
| 4 | 2004–05 | 4623 | 22484 | 27107 | 492 | 0 | 125 |
| 5 | 2005–06 | 3291 | 66544 | 69805 | 421 | 20 | 398 |
| 6 | 2006–07 | 5307 | 67579 | 72886 | 1477 | 21 | 1629 |
| 7 | 2007–08 | 5205 | 66606 | 71811 | 908 | 139 | 802 |
| 8 | 2008–09 | 39852 | 50080 | 89932 | 905 | 427 | 152 |
| 9 | 2009–10 | 12389 | 19084 | 31473 | 518 | 183 | 470 |
| 10 | 2010–11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | 2001–12 | 154 | 0 | 154 | 0 | 0 | 0 |
| | एकूण | 71679 | 299501 | 371180 | 4878 | 793 | 3576 |

संदर्भ – www.unicef.org, जिल्हा परिषद, सातारा.

***5.संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान कार्यक्रमातील अडचणी : –***

सातारा जिल्हयातील सर्व्हेक्षित गावातील कुटुंबप्रमुख, अंगणवाडीमधील अंगणवाडी सेविका आणि शाळेतील मुख्याध्यापक तसेच ग्रामसेवक यांना संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान राबविताना स्वच्छता आणि आरोगयविषयक सवयी व सुविधा तसेच पायाभूत इतर सेवा सुविधांबाबत आढळून आलेल्या समस्यांचा आणि सर्व्हेक्षण करीत असतांना संशोधकाला दिसून आलेल्या समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1)दारिद्रय रेशेच्या वरील कुटुंबाची उपेक्षा :–

शासनाच्या कोणत्याही योजनांचा सर्वात जास्त लाभ दारिद्रय रेषेवरील कुटुंबाना मिळतो. परंतु दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या वार्शिक उत्पन्नापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणा–या बहुसंख्य दारिद्रय रेशेवरील कुटुंबाना शासनाच्या कोणत्याही योजनांचा लाभ मिळत नाही.

2)उन्हाळयात पाण्याची गंभीर स्थिती :–

जिल्हयातील दुष्काळग्रस्त आणि इतर बहुसंख्य गावांमध्ये उन्हाळयात पाण्याची टंचाई असल्यामुळे कुटुंबाना पिण्याचे पाणी शुध्द व पुरेसे मिळत नाही. तसेच शौचविधीसाठी वैयक्तिक किंवा सार्वजनिक शौचालयांचा वापर पाण्याच्या टंचाईमुळे करता येत नाही. परिणामी बहुसंख्य कुटुंबांना शौचविधीसाठी उघडयावर जावे लागत आहे.

3)उघडया जागेवर शौचविधी :–

सातारा जिल्हयातील काही कुटुंबाकडे जागा उपलब्ध नसल्यामुळे तर काही कुटुंबाकडे पुरेसा पैसा उपलब्ध नसल्यामुळे स्वतःचे वैयक्तिक शौचालय बांधता आले नाही. अशा कुटुंबाना सार्वजनिक शौचालयांची नियमित स्वच्छता व देखभाल केली जात नसल्यामुळे शौचविधीसाठी उघडयावर जावे लागत आहे.

4)शौचालय बांधकामासाठी शासनाचे कमी प्रोत्साहन अनुदान रक्कमा :–

शौचालयाचे बांधकाम करण्यासाठी फारच खर्च करावा लागतो. त्यामानाने शासनाची प्रोत्साहन अनुदान रक्कम फारच कमी व तीही वेळेवर मिळत नाही. असा नाराजीचा सूर जिल्हयातील कुटुंबप्रमुख व्यक्त करीत आहेत.

5)सार्वजनिक शौचालयांच्या देखभाल व स्वच्छतेचा अभाव :–

सातारा जिल्हयातील बहुसंख्य गावात उन्हाळयात पाण्याची टंचाई असल्यामुळे सार्वजनिक शौचालयांचा वापर व त्यांची नियमित स्वच्छता व देखभाल ग्रामपंचायतीकडून केली जात नाही. त्यामुळे काही सार्वजनिक शौचालये बंद करण्यात आली आहेत.

6)पुरेशा कचराकुंडयांचा अभाव :–

जिल्हयातील काही गावात पुरेशा प्रमाणात कचरा कुंडयांची व्यवस्था केली गेली नाही आणि ज्या गावात पुरेशा प्रमाणात कचरा कुंडया आहेत पण त्या पूर्ण भरल्या तरी त्यातील कच–याची वेळेवर विल्हेवाट लावली जात नाही. हे वास्तव नाकारता येणार नाही.

7)गावातील सांडपाण्याचा व घनकच–याच्या नियोजन व व्यवस्थापनाचा अभाव :–

सातारा जिल्हयातील काही गावात पुरेशी जागा व निधी उपलब्ध नसल्यामुळे गावातील सांडपाण्याचे व घनकच–याचे नियोजन आणि व्यवस्थापन करता आले नाही.

8)अनियमित किटकनाशकांची फवारणी :–

जिल्हयातील बहुसंख्य गावात किटकनाशकांची फवारणी वर्शातून एकदाच केली जात असल्यामुळे बहुसंख्य कुटुंबाच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे.

9)अनारोग्यकारक सवयींचे प्रमाण अधिक :–

जिल्हयातील काही गावातील नागरिकांच्या अनारोग्यकारक सवयी उदा. उघडयावर शौचास जाणे, पान, तंबाखू, गुटखा खावून रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे. दारू पिउन गावात गोंधळ करणे इत्यादी बाबत प्रबोधन करूनही त्याच्यावर मात करता आली नाही.

10)शाळा व अंगणवाडीमध्ये अपुरी शौचालये व स्वच्छतागृहांची सुविधा :–

सातारा जिल्हयातील सर्वच अंगणवाडयामध्ये मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची (मुता–या) सुविधा नसल्यामुळे शौचालयाचा वापर स्वच्छतागृह (मुतारी) म्हणून केला जात आहे. तर काही प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये एकूण पटसंख्येच्या मानाने शौचालये आणि स्वच्छतागृहांची सुविधा अपुरी पडत आहे.

11)शिक्षकांसाठी स्वतंत्र शौचालये व स्वच्छतागृह सुविधांचा अभाव :–

सातारा जिल्हयातील बहुसंख्य गावातील शाळा व अंगणवाडीमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र शौचालये व स्वच्छतागृहे नसल्यामुळे व शिक्षकांना मुलांच्या शौचालये व स्वच्छतागृहांचा वापर करावा लागत असल्याचे दिसून आले.

12)स्वच्छते विशयकच्या साहित्याचा अभाव :–

जिल्हयातील बहुसंख्य शाळा व अंगणवाडीमधील वर्गांची, परिसराची तसेच शौचालये व स्वच्छतागृहांची स्वच्छता करण्यासाठी तसेच शाळेतील मुलांना वैयक्तिक स्वच्छतेसाठी आरोग्य व स्वच्छतेविशयकचे साहित्य (झाडू, साबण, टॉवेल, रुमाल इत्यादी) उपलब्ध नाही.

13)ग्रामसेवकांच्या कार्यक्षमतेवर अनिष्ट परिणाम :–

जिल्हयातील काही ग्रामसेवकांकडे एकाहून अधिक गावांचा कार्यभार असल्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर अनिश्ट परिणाम होत आहे.

14)ग्रामपंचायतींना अभियानात सामील होण्यासाठी नकार :–

जिल्हयातील बहुसंख्य ग्रामपंचायतींना अपुरे उत्पन्न, वाढती थकबाकी व तिच्या वसुलीत अडचणी, शासकीय अनुदान मिळण्यात विलंब इत्यादींचा सतत सामना करावा लागतो. या ग्रामपंचायती सुरूवातीला संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानात सामील होण्यास उत्सुक नव्हत्या.

15)महिला सरपंच व दलित सरपंचांना एकमुखी सहकार्याचा अभाव :–

महिला सरपंचाच्या व दलित सरपंचाच्या बाबतीत त्यांच्या ग्राम विकास कार्यात सतत बाहय हस्तक्षेप होत असल्यामुळे त्यांना अनेक ग्रामस्थांचे एकमुखी सहकार्य मिळत नाही.

16)राजकीय हस्तक्षेप :–

सातारा जिल्हा राजकीयदृष्टया जागरूक पक्षीय संवेदना तीव्र असल्यामुळे संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता व आरोग्यविषयक उपक्रम गावांमध्ये राबवितांना अनेक वादविवाद निर्माण झाले. त्यामुळे ग्रामस्थांचे एकमुखी सहकार्य मिळत नाही.

17)पुरूषप्रधान संस्कृतीचा प्रभाव :–

सातारा जिल्हयातील ग्रामीण भागात पुरूषप्रधान संस्कृतीचा प्रभाव अधिक असल्यामुळे सर्वच स्त्रिया उत्स्फूर्तपणे संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानात सहभागी झाल्या नाहीत.

### *6.संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानातील समस्या दूर करण्यासाठी उपाय :*

सातारा जिल्हयातील संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानातील समस्यांचा अभ्यास करून या समस्या सोडविण्यासाठी संशोधकाला पुढीलप्रमाणे उपाय सुचवावेसे वाटतात.

1)दारिद्रय रेशेखालील कुटुंबे व दारिद्रय रेशेवरील कुटुंबे असा भेदभाव न करता अल्प उत्पन्न असणा–या सर्वच कुटुंबांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ दिला जावा.
2)गावातील सर्व कुटुंबांना पिण्याचे पाणी स्वच्छ व पुरेसे मिळण्यासाठी आणि गावातील सर्व वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांचा नियमित वापर होण्यासाठी जिल्हयातील पाण्याची टंचाई भासणा–या गावांना शासनाने कायम स्वरूपी पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी.
3)स्वतःचे शौचालय नसणा–या सर्व अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांना वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम करण्यासाठी शासनाने पुरेशा प्रमाणात प्रोत्साहन अनुदान रक्कम द्यावी.
4)शौचविधीसाठी उघडया जागेचा वापर करणा–या आणि सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणा–या नागरिकांच्यावर दंडात्मक कायदेशीर कार्यवाही नियमितपणे करणे आवश्यक आहे.
5)कुटुंबातील सदस्यांची नियमित आरोग्य तपासणी होण्यासाठी व साथींच्या रोगांचे नियमित लसीकरण होण्यासाठी गावात आरोग्यविषयक सोयी सुविधा असणे आवश्यक आहे.
6)प्रत्येक गावात बंदिस्त गटार व्यवस्था निर्माण करून ही गटारे ग्रामपंचायतीने किंवा लाभार्थींनी नियमित स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. तसेच या बंदिस्त गटारातून येणा–या सांडपाण्याचा उपयोग सार्वजनिकरित्या वृक्षारोपण, शोषखड्डा किंवा पाझर खड्डा इत्यादीसाठी केला जावा.
7)गावामध्ये ठिकठिकाणी पुरेशा प्रमाणात कचरा कुंडयांची व्यवस्था निर्माण करून हा कचरा नियमित संकलित करणे आवश्यक आहे. तसेच संकलित कच–यांचा उपयोग सार्वजनिकरित्या गांडूळखत निर्मिती, बांधीव खतखड्डा, कंपोस्ट खड्डा, नाडेप टाकी इत्यादीसाठी केला जावा.
8)सांडपाण्याचे व घनकच–याचे नियोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी शासनाने ग्रामपंचायतींना पुरेशी जागा व निधी उपलब्ण करून देणे आवश्यक आहे.
9)वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम करण्यासाठी जागेची व भांडवलाची समस्या असणा–या कुटुंबाच्या सार्वजनिक शौचालये कायम मालकीची करून द्यावीत. त्यामुळे सार्वजनिक शौचालयांच्या नियमित स्वच्छता व देखभालीवर ग्रामपंचायतीला स्वतंत्र निधी खर्च करावा लागणार नाही.
10)सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी नियमित श्रमदान शिबीरे घेणे आवश्यक आहे.
11)ग्रामसेवकांच्या कार्यक्षमतेवर अनिष्ट परिणाम होवू नये तसेच ग्रामविकासाची कामे गावात प्रभावीपणे राबविता यावीत. यासाठी एका ग्रामसेवकाकडे गावातील एकूण कुटुंबसंख्येचा विचार करून गावाचा कार्यभार देणे आवश्यक आहे.
12)गावातील वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छता कायम टिकविण्यासाठी गावात स्वतंत्र ' ग्राम स्वच्छता समिती ' ची स्थापना करावी. या समितीकडून गावातील वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेची नियमित पहाणी व तपासणी होणे आवश्यक आहे.
13)सर्व शाळा व अंगणवाडीमध्ये शिक्षकांसाठी स्वतंत्र शौचालये व स्वच्छतागृहांची (मुता–या) सुविधा उपलब्ध करून द्यावी.
14)सर्व शाळा व अंगणवाडीकरिता स्वतंत्र कचरा कुंडयांची व्यवस्था असणे आवश्यक आहे.
15)शाळा व अंगणवाडीमधील शौचालये, स्वच्छतागृहे तसेच परिसराची व वर्गांची नियमित स्वच्छता करण्यासाठी स्वतंत्र कर्मचा–याची नेमणूक करणे आवश्यक आहे.
16)गावातील राजकारण, परंपरागत चालत आलेली मोठया घराण्यांची गावातील सत्ता यासारख्या गोष्टींचा विचार न करता शासकीय यंत्रणेने विविध ग्राम विकासाची कामे व असणा–या विविध योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.
17)गावात वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता कायम टिकविण्यासाठी संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानातील स्वच्छता व आरोग्यविषयक उपक्रम नव्याने नियमितपणे राबविणे आवश्यक आहे.

18)कोणत्याही योजना राबवितांना शासनाने लोकसहभागाला प्राधान्य देणे आवश्यक आहे.
19)गाव संपूर्ण स्वच्छ व निर्मल झाल्याशिवाय त्या गावाला ' निर्मल ग्राम पुरस्कार ' दिला जावू नये.

*7.समारोप :*

संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान सातारा जिल्हयात राबविताना सुरूवातीच्या काळात प्रशासनाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. कुटुंबप्रमुख, ग्रामसेवक, सरपंच, शाळेतील मुख्याध्यापक व अंगणवाडी सेविकांशी तसेच जिल्हा परिषद सातारा येथील स्वच्छता विभागातील पदाधिका—यांशी केलेली चर्चा व सखोल निरीक्षणातून स्वच्छता व आरोग्यविशयक सवयी व सुविधा, पायाभूत इतर सेवा व सुविधा आणि इतर महत्वपूर्ण घटकांबाबत काही समस्या लक्षात येतात. संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियानातील या समस्यांवर मात केली तर सातारा जिल्हयातील कानाकोप—यात या अभियानाचा संदेश प्रत्येकाच्या नसानसांत भिनल्याशिवाय राहणार नाही. जिल्हयातील बहुसंख्य गांवे " स्वच्छतेकडून आरोग्याकडे व आरोग्यातून समृध्दीकडे " निश्चित जातील. अनेक बेरोजगार तरुणांचे संसार फुलतील. दारिद्रय रेशेखालील कुटुंबे दारिद्रय रेशेवरील झाल्याशिवाय राहणार नाही. अशा प्रकारे सातारा जिल्हयातील संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान संपूर्ण महाराश्ट्रात मार्गदर्शक ठरेल अशी खात्री वाटते.

*संदर्भ सूची*


1.केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम (संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान), पेयजल आपूर्ति विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, 2004, पान नं.3.
2.प्रा. ए. वाय. कोंडेकर व प्रा. पी. बी. चांदोरकर, ' ग्रामीण समाजशास्त्र ', फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, डिसेंबर 2005, पान नं. 8.
3.डॉ. जगदीश पाटील (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा), 'निर्मल' कल्याणी कॉर्पोरेशन, सातारा, 2006, पान नं. 13.
4.कित्ता, पान नं. 14.
5.जिल्हा उद्योग केंद्र, सातारा (कार्यालयीन माहितीविषयक).
6.www.unisef.org., जिल्हा परिशद, सातारा (संपूर्ण स्वच्छता विभाग).
7.मुलाखत सर्व्हेक्षण.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net